# रस

वाक्यं रसात्मकं काव्यं। रसात्मक वाक्य म्हणजे काव्य. रस या शब्दाचा मूळ अर्थ चव किंवा रुची असा आहे. कोणताही उत्तम पदार्थ वा उत्कृष्ट काव्य यांच्या अनुभवाने रसनिष्पत्ती होते. या अनुभवालाच आपण रसास्वाद म्हणतो. व्यवहारात सहा रस आहेत. १) गोड, २) कडू, ३) आंबट, ४) तिखट, ५) तुरट, व ६) खारट. मीठ खारट असते, मध गोड तर चिंच आंबट. त्या त्या पदार्थाच्या सेवनाने आपणास त्या त्या रसाची अनुभूती येते. चिंचेचा आंबटपणा (आंबटरस) तर मधाची गोडी (गोडरस) यांनी रसाचा प्रत्यक्ष आनंद मिळतो.

वाङ्मयातील रसास्वाद म्हणजे उत्कृष्ट वाङ्मयाच्या वाचनाने, आकलनाने मिळणारी अनुभूती, आनंद. वाङ्मयातील रस म्हणजे काय हे जाणून घेण्यासाठी आधी स्थायीभाव जाणून घेऊ.

## स्थायीभाव

माणूस हा संवेदनशील प्राणी आहे. माणूस व भावना यांचे अतूट नाते आहे. ह्या भावना भय, क्रोध, राग, लोभ, प्रेम, आनंद, दुःख, कारुण्य, वात्सल्यभाव अशा विविध प्रकारच्या प्रवृत्ती आहेत. अशा स्थिर व शाश्वत भावनांना, मूलभूत साधारण प्रवृत्तींना स्थायीभाव म्हणतात.

रति, उत्साह, शोक, क्रोध, हास, भय, जुगुप्सा (कंटाळा), विस्मय, शम हे नऊ स्थायीभाव आहेत.

- प्रत्येक माणसाच्या अंतःकरणात हे स्थायीभाव कमीअधिक प्रमाणात सुप्त अवस्थेत असतात.
- लेखकाने लिहिलेले वाङ्मय वाचत असताना वाचकांच्या किंवा नाटक पाहताना प्रेक्षकांच्या अंतःकरणातील या भावना जागृत होतात, तेव्हा रस निर्माण झाला असे म्हटले जाते.
- आपल्या अंतःकरणातील स्थायीभाव हे वाचनाने वा कलाकृतीच्या दर्शनाने चाळवले जातात.
- जेव्हा जी भावना चाळविली जाते, तेव्हा तो रस निर्माण झाला असे समजावे.

हे रस नऊ असून त्यांची नावे पुढीलप्रमाणे-

**(१) शृंगार, (२) वीर, (३) करुण, (४) रौद्र, (५) हास्य,(६) भयानक, (७) बीभत्स, (८) अद्‌भुत,(९) शांत.**

- संस्कृत साहित्यकारांनी रसाची मीमांसा मोठी मार्मिक केली आहे.
- वर सांगितलेले स्थायीभाव ज्यांच्या आश्रयाने राहतात व ज्यांच्यामुळे ते प्रदीप्त होतात, त्यांना **विभाव** असे म्हणतात. ललित वाङ्‌मयातील नायक, नायिका व इतर व्यक्ती यांना **आलंबन विभाव** म्हणतात.
- एकलेपणा, चांदणे, उद्यान, भ्रूलीला यांमुळे हे स्थायी भाव उद्दीपित होतात, म्हणून त्यांना **उद्दीपन विभाव** म्हणतात.
- या स्थायी भावामुळे अंगावर रोमांच उभे राहणे, घाम फुटणे, कंठ दाटून येणे, रडू येणे हे जे परिणाम दिसतात, त्यांना **अनुभाव** म्हणतात.
- आपल्याला हवी असलेली वस्तू मिळाली नाही म्हणजे वाटणारा खेद, असूया, हेवा, राग या तात्कालिक वृत्तींना **संचारी (किंवा व्यभिचारी)** भाव म्हणतात.
- **विभाव, अनुभाव, संचारी भाव यांच्या साहाय्याने जेव्हा हे स्थायी भाव उत्कट स्थितीला पोहोचतात, तेव्हा त्यांना रस असे म्हणतात.**

या नवरसांचा थोडक्यात परिचय करून घेऊ.

**(१) शृंगार -** (शृंग - कामवासना) स्त्रीपुरुषांना एकमेकांबद्दल वाटणाऱ्या प्रेमातून, आकर्षणातून या रसाचा उगम होतो. पुढील चरण पाहा.

१) डोळे हे जुलमी गडे रोखुनि मज पाहु नका.

२) सहज सख्या एकदाच येई सांजवेळी.

३) या कातरवेळी पाहिजेस तू जवळी.

४) तो रविकर का गोजिरवाणा आवडला अमुच्या राणींना?
लाजलाजली या वचनांनी साधी भोळी ती फुलराणी!

- यासारखे चरण ऐकताना जी वैषयिक भावना जागृत होते, जो शृंगाररस निर्माण होतो, त्याला **उत्तान शृंगार** म्हणतात.
- **'सहज तुझी हालचाल मंत्रे जणु मोहिते'** यासारख्या चरणातून सोज्ज्वळ पत्नीप्रेमाने निर्माण होणारा तो **सात्त्विक शृंगार**;
- प्रेमाच्या विफलतेतून निर्माण होणारा तो **विप्रलंभ शृंगार**.
- बहुधा लावणी हा प्रकार शृंगार रस परिपोषक असतो.

**(२) वीर -** उत्साह हा या रसाचा स्थायीभाव. पराक्रम, शौर्य, धीरोदात्त प्रसंग यांच्या वर्णनांतून हा रस निर्माण होतो.

उदा. १) गर्जा जयजयकार, क्रांतिचा, गर्जा जयजयकार.

२) उठा राष्ट्रवीर हो, सज्ज व्हा उठा चला.

३) जिंकू किंवा मरू, भारतभूच्या शत्रूसंगे युद्ध आमुचे सुरू.

यासारखी समरगीते व पोवाडे ह्यांत हा वीररस पाहावयास मिळतो.

**(३) करुण** - शोक किंवा दुःख, वियोग, संकट यांतून हा रस निर्माण होतो. हृदयद्रावक अशा गोष्टींच्या वर्णनांत हा रस आढळतो. इष्टहानी व अनिष्टापत्तीमुळे मनाला, दुःख देणारा व सहृदयाच्या मनात अनुकंपा, कणव, शोक उत्पन्न करणारा रस म्हणजे **करुणरस**.

उदा. १) हे कोण बोलले बोला? राजहंस माझा निजला.

२) आई म्हणोनि कोणी, आईस हाक मारी.

३) पोर खाटेवर मृत्युच्याच दारा....

**(४) हास्य** - विसंगती, असंबद्ध भाषण, व्यंगदर्शन, विडंबन, चेष्टा यांच्या वर्णनातून हा रस निर्माण होतो. आकार, वेष, भाषण, कृती, परिस्थिती यांमधील चमत्कृतिजनक विसंगती यातून उत्पन्न होणारा व हसावयास लावणारा रस म्हणजे **हास्यरस**.

उदा. १) परटा, येशिल कधि परतून?

२) उपास मज लागला, सखेबाई, उपास मज लागला.

यांसारख्या कवितांतून किंवा सुदाम्याचे पोहे, चिमणरावाचे चऱ्हाट, साष्टांग नमस्कार, संपूर्ण बाळकराम, गुदगुल्या यांसारख्या विनोदी लेखनातून व नाटकांतून हा रस आढळतो.

**(५) रौद्र** - अतिशय क्रोध वा चीड या भावनेतून हा रस निर्माण होतो.

उदा. १) पाड सिंहासने दुष्ट ती पालथी<br>
ओढ हत्तीवरुनि मत्त नृप खालती<br>
मुकुट रंकासि दे, करटि भूपाप्रती<br>
झाड खट्खट् तुझे खड्ग रुद्रा.

**(६) भयानक** - भीती या भावनेतून हा रस निर्माण होतो. युद्ध, मृत्यू, सूड, राक्षस, स्मशान इत्यादींच्या वर्णनांतून हा रस आढळतो. गोविंदाग्रजांचे 'स्मशानातले गाणे', भीतिकथा, रहस्यकथांतील खून व सूड यांची वर्णने, युद्धकथा यातून हा रस आढळतो.

**(७) बीभत्स** - किळस, वीट, तिटकारा वर्णन करणाऱ्या कवितांतून वा वर्णनातून हा रस आढळतो. याचा स्थायीभाव जुगुप्सा.

उदा. १) ही बोटे चघळीत काय बसले - हे राम रे -लाळ ही ।<br>
काळी काय गळ्यातुनी जळमटे आहेत पन्नास ही;<br>
शी! शी! तोंड अती अमंगळ असे आधीच हे शेंबडे,<br>
आणी काजळ ओघळे वरुनि हे, त्यातूनि ही हे रडे!

**(८) अद्भुत** - विस्मय हा या रसाचा स्थायीभाव. पऱ्यांच्या कथा, अरेबियन नाइट्स, अलिबाबा व चाळीस चोर, जादूची अंगठी यांसारख्या आश्चर्यकारक गोष्टींच्या वर्णनांतून हा रस आढळतो. पुढील ओळी पाहा.

आटपाट नगरात दुधाचे तळे
तळ्याच्या काठी पेढ्यांचे मळे
नगरातले लोक सारेच वेडे
वेड्यांनी बांधलेत बर्फीचे वाडे
आंघोळीला पाणी घेतात दुधाचे
डोक्याला तेल लावतात मधाचे
फणसपोळीचे कपडे घालतात
सारे वेडे उलटे चालतात.

**(९) शांत -** परमेश्वरविषयक भक्ती, सत्पुरुषांची संगती, देवालय वा आश्रम यांच्या परिसरातील वातावरण यांच्या वर्णनातून हा रस आढळतो. याचा स्थायीभाव शम. शांतरस हा विरक्तीतून समाधानातून प्रकट होतो. रागद्वेषादि सर्वसाधारण विकृतींचा अभाव ही शांत रसाच्या अस्तित्वाची खूण आहे.

**उदा.** १) घनश्याम सुंदरा श्रीधरा अरुणोदय झाला.

२) उठि गोपालजी, जाइ धेनूकडे, पाहती सौंगडे वाट तूझी.

३) आता विश्वात्मकें देवें । येणें वाग्यज्ञें तोषावे ।
तोषोनि मज द्यावें । पसायदान हें ।।

यांसारख्या चरणांतून व भूपाळ्यांतून शांतरसाचा प्रत्यय येतो.

वाङ्मयातील नऊ रसांची ओळख आपण करून घेतली. एखाद्या कवितेत एकच रस असतो असे नाही. निरनिराळे रसही आढळतात.

साहित्यामध्ये गद्य-पद्य घटकांचा आस्वाद घेताना आपण अनेक रस अनुभवतो. गद्य-पद्य घटकांतून चपखलपणे व्यक्त होणारा आशय, दोन ओळींमधले गर्भितार्थ, रूपकात्मक भाषा, पद्य घटकांतील अलंकार, सूचकता, प्रसाद, माधुर्य हे काव्यगुण पदोपदी प्रत्ययास येतात. अर्थपूर्ण रचनांचा रसास्वाद घेण्याची कला आत्मसात झाली, की त्यामुळे मिळणारा आनंद अवर्णनीय असतो.

मनातील वैयक्तिक दुःखाची भावना जर साहित्यातून अनुभवाला आली तर तिथे करुण रसाची निर्मिती होते. मनातल्या दुःखाचा निचरा विरेचन होऊन (कॅथर्सिसच्या सिद्धांतानुसार) कारुण्याच्या सहसंवेदनेचा अनुभव घेता येतो. आणि या प्रक्रियेतून काव्याचा आस्वाद घेता येतो. तसेच वैयक्तिक दुःखाची भावना सार्वत्रिक होऊन तिचे उदात्तीकरण होते. अशा भावनांच्या उदात्तीकरणामुळे मी व माझा यापलीकडे जाऊन व्यक्ती, माणूस, समाजाच्या भावनांचा आदर करण्याची वृत्ती जोपासली गेली तर नात्यांमधील, व्यक्तीव्यक्तींमधील भावसंबंधाचे दृढीकरण होते.

कोणतीही कलाकृती अभ्यासताना त्या कलाकृतीचा आस्वाद घेता आला तरच ती आनंददायी ठरते. एखादी कलाकृती दिसणे, ती पाहणे व ती अनुभवणे हे कलाकृतीच्या आस्वादाचे टप्पे आहेत. केवळ डोळ्यांनी नव्हे तर कलाकृती मनाने अनुभवता आली पाहिजे. कोणत्याही कवितेचे, पाठाचे वाच्यार्थ, भावार्थ व गर्भितार्थ यांचे आकलन होऊन संवेदनशीलतेने कलाकृतीतील अर्थ, भाव, विचार, सौंदर्य टिपता आले पाहिजे. कवीला काय सांगायचे आहे याविषयी दोन ओळींमधील दडलेला मथितार्थ समजला तरच कवितेचे पूर्णांशाने आकलन होते व त्याच्या रसनिष्पत्तीचा आनंद घेता येतो. प्रत्येक साहित्य घटकाकडे पाहण्याची, अर्थ समजून घेण्याची ही आस्वादक दृष्टी विकसित झाली, तर भाषेचा खरा आनंद प्राप्त होईल.

रस कल्पना शिकवताना प्रामुख्याने कवितांची उदाहरणे दिली जातात. याचा अर्थ रस फक्त काव्यातच असतो असे नाही तर तो सर्व प्रकारच्या साहित्यात असतो. तसेच कधीकधी या नऊ रसांव्यतिरिक्त अनेक वेगवेगळ्या प्रकारच्या भावभावनाही असू शकतात. साहित्यामध्ये एक किंवा अधिक रस असू शकतात. कवितेतील रस हा विशिष्ट शब्दांत नसतो. उदाहरणार्थ, कवितेत 'वीर' हा शब्द आला म्हणजे त्या कवितेत वीररस असेलच असे नाही. तसेच 'हुंदका' शब्द आला म्हणजे तिथे करुण रस असेलच असे नाही.

संत निळोबा महाराज यांच्या अभंगातून (सर्व रस) नवरसांचा उल्लेख अत्यंत चपखलपणे केलेला आहे. मुख्य म्हणजे तो अर्थवाही आहे.

सांगो नवरस लक्षण । तरी शृंगार हास्य करुण ।
धीर वीर भयानक जाण । बीभत्स अद्‌भुत शांतरस ।।१।।
शृंगारिक ते माधुर्य गाणे । हास्य ते विनोद करणें ।
कारुण्य तें कींव भाकणे । धैर्य उपजवणे ते धीर ।।२।।
वीर तें युद्धाच्या गांठी । शब्दामागे शब्द उठी ।
भयानक रस भय घाली पोटी । बीभत्स त्याहुनी कुष्टी उच्छृंखल ।।३।।
अद्‌भुत रस ते नवलावाणें । जे का अचाटचि बोलणे ।
श्रो तयातें विस्मय देणे ऐकतां शहाणे निर्बुजती ।।४।।
शांतरस तो शुद्ध सात्त्विक । विकार विवर्जित माजि विवेक ।
निळा म्हणे हे नवरस देख । जाणती गायक चतुर ते ।।५।।

## काव्य

**वाक्यात रस असला, तर ते वाक्य अंतःकरणाला जाऊन भिडते. त्यालाच काव्य म्हणतात. 'वाक्यं रसात्मक काव्यम्' हे संस्कृत वचन प्रसिद्ध आहे.**

शब्दशक्ती, अलंकार, रस हे काव्याची शोभा वाढविणारे, उत्तम काव्याची वैशिष्ट्ये असणारे घटक आहेत. याप्रमाणेच काव्यगुण हे काव्याची शोभा वाढविणारे महत्त्वाचे घटक आहे.

रसपरिपोष असलेल्या काव्यात गुण अंगभूत असतात. काव्य हे अनेक गुणांच्या संकलित प्रभावाने आणि अलंकारांच्या प्रमाणबद्ध योजनेने सिद्ध होते. गुण हे काव्यगुण म्हणून ओळखले जात असले तरी ते गद्यलेखनाचीही परिणामकारकता वाढवितात. गद्य असो वा पद्य वाचकमनाला थेट स्पर्श करण्याची क्षमता काव्यगुणांमध्ये असते.

### काव्यगुण

**श्लेष, प्रसाद, समता, माधुर्य, सुकुमारता, अर्थव्यक्ती, उदारता, ओज, कांती आणि समाधी** असे दहा काव्यगुण आहेत.

त्यातील काही प्रमुख व उत्तम काव्यात प्रामुख्याने दिसणारे रसपोषक गुण म्हणजे **प्रसाद, माधुर्य व ओज.**

या प्रमुख गुणांचा सोदाहरण परिचय करून घेऊ.

**(१) प्रसाद - प्रसाद म्हणजे सोपेपणा.**

- काव्य वाचल्यानंतर त्यातील अर्थ सहज समजला पाहिजे. अवघड, पांडित्यपूर्ण, मोठमोठे समास असलेले शब्द वापरून केलेली रचना रसाला हानीकारक असते.
- सोपी, सुबोध व चटकन अर्थ समजणारी रचना म्हणजे प्रासादिक रचना. या गुणाला कवितेत फार मोठे स्थान आहे. **उदा.**

ऐल तटावर पैल तटावर हिरवाळी लेऊन
निळा सावळा झरा वाहतो बेटाबेटांतून
बालकवींची औदुंबर ही संपूर्ण कविताच प्रसाद गुणाचे उत्तम उदाहरण आहे.

तांब्यांची 'माहेरची आठवण', बालकवींची 'फुलराणी', 'औदुंबर', 'यशवंतांची आई', ग. दि. माडगूळकरांच्या कविता म्हणजे प्रासादिक काव्यांचे नमुने होत.

**(२) माधुर्य - माधुर्य म्हणजे गोडवा.**

- काव्यात जसे सोपे शब्द हवेत, तसेच कोमल व मृदुवर्णांच्या योजनेने ते कानाला मधुर व सुखद आणि नादामुळे ते गुणगुणावेसे वाटावेत.
- कोमल, अनुनासिक वर्ण व अनुप्रासात्मक रचना यांमुळे काव्याला माधुर्य प्राप्त होते. मृदु वर्णाच्या योजनेमुळे काव्याला माधुर्य प्राप्त होते व ते श्रवणीयही बनते.

**उदा.** १) राधाधरमधुमिलिंद जयजय, रमारमण गोविंद
कालिंदी तट पुलिंद लांछित सुरनुतपादारविंद.
२) हे मंदमंद पद सुंदर कुंददंती। चाले जसा मद-धुरंधर इंद्रदंती॥

**(३) ओज - ओज म्हणजे भाषेतील तेजस्विता आवेश किंवा जोरदारपणा.**

- कठोर वर्ण, दीर्घ समास, संयुक्त व्यंजने यांचा अधिक वापर करून कवी रचनेत उत्साह व जोरदारपणा निर्माण करतो.
- यांच्या वापराने लेखनात ओज येतो. ओज गुणाने युक्त रचना वीर व रौद्र रसांना पोषक ठरते.
- स्वा. सावरकर यांचे लेखन हे ओजपूर्ण काव्याचे उत्तम उदा. होय.

**उदा.** कडकडा फोड नभ, उडव उडु मक्षिका,
खडबडवि दिग्गजा तुडव रविमालिका,
मांड वादळ, उधळ गिरि जशी मृत्तिका,
खवळवी चहुकडे या समुद्रा!

| प्रसाद | माधुर्य | ओज |
|---|---|---|
| • प्रसाद म्हणजे सुबोधता<br>• वाक्यार्थाचे ज्ञान सहजतेने होणे.<br>• प्रसादयुक्त काव्य म्हणजे प्रासादिक रचना<br>• रसास्वादास/रसपरिपोषासआवश्यक अर्थबोध करणारा गुण म्हणजे प्रसाद.<br>• पांडित्यपूर्ण शब्द - फार लांब वाक्ये यांचा प्रभाव हानीकारक | • माधुर्य म्हणजे मधुरता, गोडवा<br>• माधुर्य या गुणामुळे काव्य पुन्हा पुन्हा वाचावेसे वाटते.<br>• सूक्ष्म अनुप्रासाचा वापर | • ओज म्हणजे आवेश, जोरकसपणा<br>• कठोर वर्ण, संयुक्त व्यंजने, समास यांचा योग्य व प्रमाणबद्ध वापर.<br>• वीर, रौद्र, बीभत्स आणि भयानक या रसांच्या निष्पत्तीला अनुकूल |

शब्दांच्या शक्ती, रस व काव्यगुण समजले म्हणजे काव्याच्या रसग्रहणाला मदत होते.